PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Suvashinichi hi satvapariksha
Year:

Song: Ashi re kashi deva hi mansachi naati
Lyricist: Jagdish Khebudkar

हो...
अशी रे कशी देवा ही माणसाची नीती
अशी रे कशी देवा ही माणसाची नीती
मातीचं करी सोनं
सोन्याची करी माती
मातीचं करी सोनं
सोन्याची करी माती
अशी रे कशी देवा ही माणसाची नीती

संसार सारीपाट बसेना कधी मेळ
चालला तुझ्या हाती हा बाहुल्यांचा खेळ
संसार सारीपाट बसेना कधी मेळ
चालला तुझ्या हाती हा बाहुल्यांचा खेळ
असून डोळे दोन
असून डोळे दोन
आंधळी झाली नाती
अशी रे कशी देवा ही माणसाची नीती

एकाच झाडावरी फळे ही दोन आली
एकाची चव गोड एकाची कडू झाली
एकाच झाडावरी फळे ही दोन आली
एकाची चव गोड एकाची कडू झाली
अमृत विष दोन्ही
अमृत विष दोन्ही एकाच बीजापोटी
अशी रे कशी देवा ही माणसाची नीती

मिळवी एक पुण्य दुसरा लुटे पाप
एकाला वरदान एकाला मिळे शाप
मिळवी एक पुण्य दुसरा लुटे पाप
एकाला वरदान एकाला मिळे शाप
एकाचा होई काटा
एकाचा होई काटा एकाची फुले होती
अशी रे कशी देवा ही माणसाची नीती

ही माया नाशवंत प्रेमाला नाही अंत
माणसा होई जागा साक्षीला भगवंत
हा... भगवंत
ही माया नाशवंत प्रेमाला नाही अंत
माणसा होई जागा साक्षीला भगवंत
सरेल जन्म सारा आ...
सरेल जन्म सारा
उरेल काय हाती
अशी रे कशी देवा
अशी रे कशी देवा
ही माणसाची नीती
मातीचं करी सोनं
सोन्याची करी माती
मातीचं करी सोनं
सोन्याची करी माती
अशी रे कशी देवा
ही माणसाची नीती
आ...
मातीचं करी सोनं
सोन्याची करी माती
अशी रे कशी देवा
ही माणसाची नीती
मातीचं करी सोनं
सोन्याची करी माती

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*